नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर तालुक्यातील पुरामुळे पुनर्वसित झालेल्या गावांतील नागरी सुविधेच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मदत व पुनर्वसन विभाग
शासन निर्णय क्रमांक- एफएलडी-२०२६/प्र.क.७२(ई-१६५१८५८)/पुनर्वसन-०७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १३ ऑगस्ट, २०२६

वाचा:-

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. सीएफएल ५९८९/प्र.क्र.२१७/म-३, दि.०१.०८.१९८९
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. सीएफएल ५९८९/प्र.क्र.२१७/म-३, दि.१५.०२.१९९०
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.सीएलएस-११-०५/प्र.क्र.२३९/म-३, दि.०९.०१.२००६
४. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.आरपीए २००८/प्र.क्र.५५०/र-१, दि.०१.०८.२००९
५. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. ०१११/प्र.क्र.१८/र-१, दि.२८.०३.२०११
६. वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२,दि.१७.०४.२०१५
७. वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.विअप्र २०१५/प्र.क्र.२०/२०१५/विनियम, दि.१९.०१.२०१६
८. शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. विअसु २०१५/ प्र.क्र.२१८/ इमारती-२, दि.१६.१२.२०१५
९. जिल्हाधिकारी, नांदेड यांचे ई ऑफीस पत्र क्र. NANDED-३३०२(१)/५८/२०२५-NAN-DRO, I/१८६४३४७/२०२५, दि. ०६.११.२०२५
१०. जिल्हाधिकारी, नांदेड यांचे ई ऑफीस पत्र क्र. NANDED-३३०२(१)/५८/२०२५-NAN-DRO, I/२२०७०८५/२०२६, दि. ०२.०३.२०२६

प्रस्तावना:-

नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर तालुक्यातील पुरामुळे पुनर्वसित झालेल्या गावांतील नागरी सुविधा कामांची अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेस्तव जिल्हाधिकारी, नांदेड यांनी संदर्भाधीन क्र. ९ येथील पत्रांन्वये शासनास सादर केली आहेत.

२. वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग तीन अनुक्रमांक ४ परिच्छेद क्र.२७ (२) (अ) अनुसार योजनेला किंवा प्रस्तावाला प्रशासकीय (वित्तीय मंजुरी धरुन) मान्यता देण्याबाबत प्रशासनिक विभागास असलेल्या अधिकारानुसार जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडून प्राप्त प्रस्तावातील नागरी सुविधा कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर तालुक्यातील पुरामुळे पुनर्वसित झालेल्या गावांतील पुढील तक्त्यात नमूद नागरी सुविधा कामांच्या एकूण रूपये १६,४६,००,०००/ (अक्षरी रुपये सोळा कोटी

शेहेचाळीस लक्ष फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकांना पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. (सदर पुनर्वसित गावठाणांमधील नागरी सुविधा कामांचा सविस्तर तपशील “परिशिष्ट अ” मध्ये सादर करण्यात येत आहे.)

(रुपये लाखात)

अ.क्र.	गावाचे नाव	नागरी सुविधा काम	अंदाजपत्रकीय रक्कम
ता. हिमायतनगर, जि. नांदेड			
१	आंदेगाव (पश्चिम)	सी.सी. रस्ता व नाली बांधकाम	१८५.००
२	आंदेगाव (पूर्व)	सी.सी. रस्ता व नाली बांधकाम	२०७.००
३	पवना	सी.सी. रस्ता व नाली बांधकाम	२७१.००
४	दुधड	सी.सी. रस्ता व नाली बांधकाम	२५६.००
५	टेंभुर्णी	सी.सी. रस्ता व नाली बांधकाम	३४६.००
६	कामारी	सी.सी. रस्ता व नाली बांधकाम	३८१.००
एकूण			**१६४६.००**

अटी व शर्ती :-

१. नागरी सुविधा कामे करताना प्रस्तुत प्रस्तावित समाविष्ट असलेले गौण खनिज स्वामीत्वधनाची वसूली करण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जीटीएन १०८३/२१७/र-१२, दि.१०.०२.१९८३, शासन निर्णय क्र. आरसीपीए २००८/प्र.क्र.५५०/र-१, दि. ०१.०८.२००९ व शासन परिपत्रक क्र. आरपीए ०१११/ प्र.क्र.१८/र-१, दि. २८.०३.२०११ अन्वये पुनर्वसित/ विस्तारित गावठाणांतील नागरी सुविधा पुरविण्यासाठी निर्धारित करण्यात आलेल्या भौतिक मानकांनुसार तपासणी करुन काम करुन घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि. नांदेड यांची राहील.

३. प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांवर होणारा खर्च मंजूर अंदाजपत्रकांतील रकमेपेक्षा विहित मर्यादेपेक्षा अधिक होणार नाही, याची संबंधित मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

४. प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांसाठीच्या अंदाजपत्रकांत दर्शविलेली कामनिहाय रक्कम तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेतील अटींचे विहित कार्यपध्दतीनुसार पालन होईल, याची संबंधित कार्यान्वयन यंत्रणेच्या संबंधित मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता व संबधित कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

५. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि. नांदेड यांनी प्रस्तावाधीन नागरी सुविधा सर्व दृष्टीने पूर्ण झाल्यावर व त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, नांदेड यांचेकडून प्रमाणपत्र घेतल्यानंतर संबंधित जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित कराव्यात व त्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांचेमार्फत शासनाच्या पुनर्वसन विभागास अवगत करावे.

६. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यनियमावलीतील प्रचलित नियमांनुसार सदर नागरी सुविधा कामांच्या अंदाजपत्रकांस संबंधित कार्यान्वयन यंत्रणेच्या मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली असावी.
७. पुनर्वसन योजनेतून पुरविण्यात आलेल्या नागरी सुविधा अन्य योजनेतून पुनश्च: पुरविल्या जाणार नाहीत, नागरी सुविधा कामे यापूर्वी अन्य कोणत्याही योजनेतून करण्यात आलेली नाहीत. अथवा सदरची कामे अन्य योजनेत समाविष्ट नाहीत, तसेच या कामांवर यापूर्वी खर्च करण्यात आलेला नाही, याची संबंधित जिल्हाधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी.
८. प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांचा उचित दर्जा राखला जाईल, याची संबंधित मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता व संबंधित कार्यकारी अभियंता यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.
९. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि. नांदेड यांनी प्रस्तुत प्रशासकीय मान्यता आदेशांतील अटींची पूर्तता पूर्ण करुन प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामे तात्काळ सुरु करावीत.

२. निविदा प्रक्रिया व कार्यारंभ आदेश:- कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि. नांदेड यांनी प्रस्तुत प्रशासकीय मान्यता आदेशातील अटींची पुर्तता करून प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांची निविदा प्रक्रिया तात्काळ सुरु करावी. तसेच निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निविदा प्राप्त कामांसाठीचे कार्यारंभ आदेश देऊन नागरी सुविधा कामे तात्काळ सुरु करावीत.

३. संबंधित कार्यान्वयन यंत्रणेच्या कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि. नांदेड यांनी वरीलप्रमाणे नमूद केल्यानूसार सुरु करण्यात आलेल्या नागरी सुविधा कामांच्या प्रगतीचा अहवाल/ खर्चाच्या प्रगतीचा अहवाल इ. सादर करुन कामाच्या प्रगतीनूसार सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाच्या कालावधीत सदर कामे पूर्ण करण्याच्या नियोजनानूसार खर्च "मागणी क्रमांक-सी ६, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य-०२, पूर, चक्रीवादळे इत्यादी, १०१, अनुग्रह सहाय्य (९३) इतर, (९३)(०५) पुरामुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता रस्ते, पाणी पुरवठा, शाळा, चावडी, विद्युत पुरवठा, नागरी सुविधावरील खर्च (अनिवार्य) (दत्तमत) (२२४५ ०९८८) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली आवश्यक निधीची मागणी शासनास सादर करावी.

४. त्या अनुषंगाने मंजूर व उपलब्ध तरतुदीतून आवश्यक तेवढा निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर वितरीत करण्यात येणारा निधी ज्या कामासाठी उपलब्ध करुन दिला जाईल त्याच कामासाठी त्याचा विनियोग करण्यात यावा. तसेच वितरीत करण्यात येणा-या निधीच्या अनुषंगाने उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilization Certificates), सदर कामे अन्य कोणत्याही योजनेतील निधीतून पूर्ण केलेले नसल्याचे प्रमाणपत्र व काम पूर्ण झाल्यावर Geo-tagging करुन त्याचे प्रमाणपत्र प्राथम्याने सादर करावीत.

५. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय, क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२ दि.१७/०४/२०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग-तीन अ.क्र.४,

परिच्छेद क्र. २७(२) (अ) अन्वये प्राप्त अधिकारात व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१३१७१७४६०८४१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY MAROTI JAGTAP

Digitally signed by SANJAY MAROTI JAGTAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=9EA94B7D58FC204D63A497943E6C56976C537462D5F2964980C30906051D44D7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2C1FC771D686D36A26A8AF979409826984378A73F9D4AEECA990209686CC25BD, cn=SANJAY MAROTI JAGTAP
Date: 2026.08.13 17:19:04 +05'30'

(सं. मा. जगताप)

कार्यासन अधिकारी, मदत व पुनर्वसन विभाग

प्रत-

१. विभागीय आयुक्त तथा मुख्य नियंत्रण अधिकारी (पुनर्वसन) छ. संभाजीनगर विभाग, छ. संभाजीनगर
२. उपआयुक्त (पुनर्वसन), छ. संभाजीनगर विभाग, छ. संभाजीनगर
३. जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन उपसंचालक, नांदेड
४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड
५. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड
६. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि. नांदेड
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ / नागपूर-
८. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई -१/ नागपूर-२
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड
१०. वित्त विभाग, कार्यासन व्यय ९/अर्थसंकल्प ६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
११. कार्यासन अधिकारी, कार्या.ब-१/ पी.ए.सी./ मदत-०३, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. निवड नस्ती, कार्यासन पुनर्वसन-०७, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई

****

परिशिष्ट अ

१. मौजे आंदेगाव पश्चिम, ता. हिमायतनगर जि. नांदेड				
अ.क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
१	चिंतामणी थोटे यांचे घर	जि. प. शाळेपर्यंत	४५.००	८४५.००
२	जुने आंदेगाव पासून	नवीन आंदेगाव पर्यंत	४००.००	-
एकूण लांबी			**४४५.००**	**८४५.००**

२. मौजे आंदेगाव पूर्व, ता. हिमायतनगर जि. नांदेड				
अ.क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
१	मारोती उमाजीराव यांचे घर	यम्मलवाड शाहीर यांचे घर	२२.००	३४४.००
२	अंकुश मुतनवाड यांचे घर	अंगणवाडी	२५.००	५०.००
३	नागनाथ मंदिरारापासून	मस्जिद पर्यंत	१५०.००	-
४	व्यंकट पंढरी यांचे घर	नारायण गंधेवाड यांचे घर	२०.००	४०.००
५	शेख महेबूब यांचे घर	मस्जिद पर्यंत	६०.००	१२०.००
६	ग्रामपंचायत	आनंद मुतनवाड यांचे घर	९०.००	१८०.००
७	बालू लक्ष्मण यांचे घर	उदारम पर्यंत	१५.००	३०.००
८	सुभाष उप्पलवाड यांचे घर	लक्ष्मण उप्पलवाड यांचे घर	२०.००	४०.००
९	मारोती यालकेवाड यांचे घर	जिजाबाई गमेवाड यांचे घर	६०.००	१२०.००
१०	धम्मा वडवे यांचे घर	विठ्ठल वडवे यांचे घर	१०५.००	२१०.००
एकूण लांबी			**५६७.००**	**११३४.००**

३. मौजे पवना, ता. हिमायतनगर जि. नांदेड				
अ.क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
१	श्यामराव गायकवाड यांचे घर	उत्तम राऊत यांचे घर	१७०.००	१७०.००
२	गौतम सावते यांचे घर	प्राथमिक आरोग्य केंद्र	३३.००	३३.००
३	प्राथमिक आरोग्य केंद्र	मारुती कट्टमवाड यांचे घर	११२.००	११२.००
४	अरविंद राऊत यांचे घर	गंगाधर गाडेकर यांचे घर	१५.००	१५.००
५	गंगाधर गाडेकर यांचे घर	नारायण राऊत यांचे घर	५८.००	५८.००
६	बालू राऊत यांचे घर	भीमराव गोयेले यांचे घर	६९.००	६९.००
७	उद्धव राऊत यांचे घर	दिपक राऊत यांचे घर	५४.००	५४.००
८	बालाजी गाडेकर यांचे घर	भावन तपासकर यांचे घर	५१.००	५१.००
९	नागेश राऊत यांचे घर	राम आकापवाड यांचे घर	१०५.००	१०५.००
१०	बाळाजी सद्गुणेवाड यांचे घर	नागेश राऊत यांचे घर	१०७.००	१०७.००
११	सखुताई राऊत यांचे घर	सुभाष राऊत यांचे घर	७५.००	७५.००
१२	सनाथ पाटंगे यांचे घर	भोलण्णा अर्गुलवाड यांचे घर	५०.००	५०.००
१३	गणपत चिंतलवाड यांचे घर	छत्रपती पुलेवाड यांचे घर	५२.००	५२.००
१४	खोबाजी पंगेवाड यांचे घर	लक्ष्मण बालपेलवाड यांचे घर		
एकूण लांबी			**१०१६.००**	**१०१६.००**

४. मौजे दुधड, ता. हिमायतनगर जि. नांदेड				
अ.क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
१	सुभाष कांबळे यांचे घर	शेषराव वाघमारे यांचे घर	१३०.००	१३०.००
२	भाकर जगदेवराव यांचे घर	जब्बार पठाण यांचे घर	१३०.००	१३०.००
३	शामराव वाठोरे यांचे घर	गोपाल लोखंडे यांचे घर	१३०.००	१३०.००
४	सर्जा बलखंडे यांचे घर	भीमराव वाठोरे यांचे घर	३५.००	३५.००
५	बालाजी सटलवाड यांचे घर	तुकाराम हुरडुळे यांचे घर	१८०.००	३६०.००
एकूण लांबी			**६०५.००**	**७८५.००**

५. मौजे टेंभुर्णी, ता. हिमायतनगर जि. नांदेड				
अ.क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
१	महादेव देवसरकर यांचे घर	जि.प.प्रा. शाळेपर्यंत	६०.००	१२०.००
२	जि.प.प्रा. शाळेपासून	मुख्य रस्त्यापर्यंत	३०.००	६०.००
३	विठ्ठल देवसरकर यांचे घर	संतोष कदम यांचे घर	२२०.००	२२०.००
४	मरीबा जलपटे यांचे घर	मुख्य रस्त्यापर्यंत	११०.००	२२०.००
५	प्रभाकर भीमराव यांचे घर	विश्वनाथ कदम यांचे घर	११०.००	२२०.००
६	डॉक्टर माने यांचे घर	कॅनाल कॉर्नर पर्यंत	११०.००	२२०.००
७	प्रभाकर माने यांचे घर	पाण्याची टाकी पर्यंत	६०.००	१२०.००
८	तानाजी अवधूत यांचे घर	अनिल पाटील यांचे घर	१७.००	१७.००
९	डॉक्टर पाटील यांचे घर	बाजीराव नामदेवराव यांचे घर	१७.००	१७.००
१०	प्रल्हाद पाटील यांचे घर	आनंदराव कदम यांचे घर	१७.००	१७.००
११	कमानी पासून	छत्रपती चौक पर्यंत	२५०.००	५००.००
एकूण लांबी			**१००१.००**	**१७३१.००**

६. मौजे कामारी, ता. हिमायतनगर जि. नांदेड				
अ.क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
१	शिरपुळे जिमपासून	जि.प. शाळेपर्यंत	१०००.००	१०००.००
२	सत्यप्रकाश मोधोकर यांचे घर	गणेश शिरफुळे यांचे घर	५०.००	५०.००
३	कैलास शिरफुळे यांचे घर	सदानंद यांचे घर	११०.००	२२०.००
४	खंडू शिरसाठ यांचे घर	संजय कांबळे यांचे घर	२५.००	२५.००
५	ज्ञानेश्वर शिरफुळे यांचे घर	राम कांबळे यांचे घर	२५.००	२५.००
६	शिवाजी कांबळे यांचे घर	देवराव पवार यांचे घर	२५.००	२५.००
७	महादेव कदम यांचे घर	मारोती सोलंके यांचे घर	६२.००	६२.००
८	ज्ञानेश्वर इंगोले यांचे घर	सत्यराम काळे यांचे घर	२५.००	२५.००
९	विठ्ठल कदम यांचे घर	यशवंत नाईक यांचे घर	६५.००	६५.००
१०	विलास नरवाडे यांचे घर	पुंजाराम गंगासागर यांचे घर	४०.००	४०.००
११	सुनिल घोगरे यांचे घर	औशाई कालबांडे यांचे घर	२०.००	२०.००

६. मौजे कामारी, ता. हिमायतनगर जि. नांदेड				
अ.क्र.	**पासून**	**पर्यंत**	**सी.सी. रस्ता (मी.)**	**सी.सी. नाली (मी.)**
१२	संतोष बलकटवार यांचे घर	गोविंद नरवाडे यांचे घर	२०.००	२०.००
१३	बाबासाहेब नरखेडे यांचे घर	दशरथ नकाडे यांचे घर	२०.००	२०.००
१४	गणपत गाढरे यांचे घर	शामी बारडकर यांचे घर	३०.००	३०.००
१५	प्रकाश उमजी यांचे घर	नागोराव शिरफुळे यांचे घर	३०.००	३०.००
१६	भगवान शिरफुळे यांचे घर	शंकर पांडुरंग यांचे घर	३०.००	३०.००
१७	सुदर्शन देवसरकर यांचे घर	खंडू गाभरे यांचे घर	३०.००	३०.००
एकूण लांबी			**१६०७.००**	**१७१७.००**

****